# नागपुर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर.


दिनांक 03/07/2020 (शुक्रवार)

(सकाळ)

### रेती चोरी करणाऱ्या आरोपी विरूद्ध गुन्हा नोंद

पो.स्टे. खापा :– अंतर्गत 7 किमी अंतरावर मौजा रोमडोंगरी येथे दिनांक 01/07/2020 चे 22.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे – कल्लु हसन कन्नोजे(मंडळ अधिकारी खापा), वय 54 वर्ष, रा. नवीन वस्ती खापा हे अवैध गौनखनिज रेती वाहतुकीला व उत्खननाला आळा बसविण्याकरीता मौजा रामडोंगरी येथील परिसराची पाहणी करित असता यातील आरोपी नामे– परसराम गुरलमल गंगवाणी, रा. नागपुर हा कन्हान नदीचे पात्रातील चोरीने वाळुचा उपसा करून त्याचे शेत सर्वे क्र 1 मध्ये उपसा केलेली 220 ब्रास वाळु किंमती 4,40,000/– रू. ची साठवुन ठेवला असतांना मिळुन आला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापा येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा गंगाप्रसाद ठाकरे हे करीत आहे.

### विनयभंग

1) पो.स्टे. कन्हान :– दि. 18/06/2020 रोजी व त्यापुर्वी पासुन 16 वर्षीय पिडीत/फिर्यादी हिला आरोपी नामे– विजय मुकुंदा वाघमारे, वय 54 वर्ष, रा. सत्रापुर, कन्हान याने पीडिता व तिच्या आईला मारहाण करून त्यांना अश्लिल शिवीगाळ केली. तसेच आरोपीने पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम 354 (अ)(4), 509, 323 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास मसपोनि पाटील या करीत आहे.

2) पो.स्टे. सावनेर :– दि. 01/07/2020 चे 23.00 वा. दरम्यान 30 वर्षीय पिडीत/फिर्यादी हि घरी जेवण करून आराम करीत असता आरोपी नामे– दिनेश सुखदेव भारती, पिपळा याने तिच्या घरामध्ये प्रवेश केला. यानंतर आरोपीने पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम 354, 452 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सफौ गुप्ता हे करीत आहे.

# दुखापत

पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत 7 कि. मी अंतरावर खदान क्र. 4 कन्हान येथे दिनांक 02/07/2020 चे 16:00 वा. ते 16.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– गणेश जोतुप्रसाद गौतम, वय 30 वर्ष, रा. खदान क्र. 4 कन्हान व आरोपी 1) गणेश प्रजापती, रा. खदान क्र. 4 कन्हान हे दोघेही मित्र असुन फिर्यादी हे आपले घरी जात असता आरोपी क्र. 1. याने फिर्यादीस 'तु अभी के अभी मुझे शराब पिला, नही तो तेरे को मै मारुंगा' असे बोलुन शिवीगाळ केली. फिर्यादीने दारू पाजण्यास नकार दिल्याने आरोपीने काठीने फिर्यादीस मारहाण करून जखमी केले. तसेच त्या ठिकाणी येत असलेल्या फिर्यादीचा साळा हा मध्यस्ती गेला असता तेथे हजर असलेले आरोपीचा मोठा भाऊ नामे– 2) सोनु प्रजापती व त्याचा मित्र व 3) प्रमोद सिंग यांनी हातबुक्याने व दगडाने फिर्यादीच्या साळयाला डोक्यावर मारून जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम 324, 34, 504, 506 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास नापोशी रंगारी पो.स्टे कन्हान 9834087136 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर